# अर्जुन चव्हाण यांचे आज मार्गदर्शन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी अधिविभागातील प्रा. डॉ. अर्जुन चव्हाण हे आज, रविवारी 'वैश्विक फलक पर रामायण विश्वकोश' या विषयावर आयोजित आंतरराष्ट्रीय वेबिनारमध्ये मार्गदर्शन करणार आहेत.

हिंदी समीक्षक म्हणून परिचित असलेले डॉ. चव्हाण 'महाराष्ट्र में रामायण विश्वकोश के लिए उपलब्ध आद्यतन सामग्री की प्रासंगिकता' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

# शिवाजी विद्यापीठात आज ऑनलाईन राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विदयापीठ राज्यशास्त्र अधिविभाग व नेहरू अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. १०) 'महाराष्ट्रातील नव-सामाजिक चळवळी' याविषयावर ऑनलाईन राष्ट्रीय चर्चासत्र, राज्य परिषदेचे २६ वे अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. चर्चासत्रात नेहरूवादी सामाजिक चळवळी, सहकार व शैक्षणिक चळवळ, कोरोना संकट याविषयावर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

# बाधित शहरांतून येणाऱ्यांची सीपीआरमध्ये स्वतंत्र तपासणी

## स्वॅब घेऊन शिवाजी विद्यापीठात क्वारंटाईन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनाचा वाढता प्रकोप लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने मायक्रो प्लॅन तयार केला आहे. आरोग्य विभागाने देखील नेटके संयोजन केले आहे. सीपीआर कोरोनासाठी राखीव ठेवले आहे. गेल्या आठवड्याभरापासून पुणे, मुंबईसह अन्य शहरांतून नागरिक कोल्हापूरच्या दिशेने परतू लागले आहेत. त्यांची कोरोनाची प्राथमिक तपासणी सक्तीची असल्याने सीपीआरमध्ये गर्दी वाढली आहे. बाधित शहरांतून येणाऱ्या नागरिकांची कोरोना प्राथमिक तपासणीसाठी स्वतंत्र कक्ष उभा केला जाणार आहे.

कोरोना मुक्तीच्या दिशेने जिल्ह्याची घोडदौड सुरू होती. मात्र, शनिवारी मध्यरात्री एकाचवेळी तीन रुग्ण कोरोना पॉझिटिव्ह आल्याने आरोग्य विभागाची झोप उडाली आहे. खबरदारी म्हणून आरोग्य प्रशासनाने बाधित शहरातून येणाऱ्या रुग्णांवर विशेष लक्ष केंद्रीत केले आहे. सीपीआरमध्ये तपासणीसाठी नागरिकांची वर्दळ वाढली आहे. कोण कोठून आला आहे, हेच कळत नाही. त्यामुळे सीपीआरची तारांबळ उडत आहे. त्यामुळे सीपीआर प्रशासनाने बाधित शहरातून येणाऱ्या नागरिकांची स्वतंत्र तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी वैद्यकीय अधीक्षक कार्यालयाला लागून असेलेल्या जागेत बाह्य रुग्ण नोंदणी तपासणी सुरू केली जाणार आहे.

बाधित शहरातून येणाऱ्या रुग्णांची तपासणी करून स्वॅब घेऊन त्यांना शिवाजी विद्यापीठातील आयसोलेशन कक्षात दाखल केले जाणार आहे. तसेच त्यांच्यावर विशेष लक्ष केंद्रीत केले जाणार आहे. कारण जिल्ह्यात कोरोनाचा शिरकाव बाहेरून येणाऱ्या नागरिकांद्वारेच झाला आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासन आणि सीपीआर यांच्या संयुक्त विचारातून हा निर्णय घेतल्याची माहिती सीपीआरच्या अधिष्ठाता डॉ. मिनाक्षी गजभिये यांनी दिली.

# शिवाजी विद्यापीठात आढळला रुडी शेलडक पक्षी

## प्राणीशास्त्र विभागाची माहिती : भारतात 'ब्राह्मणी बदक' म्हणून ओळख

प्रतिनिधी
कोल्हापूर

'रुडी शेलडक' (टॅडोर्ना फेरुजीनिया) हा स्थलांतरित पक्षी शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात प्राणीशास्त्र अधिविभागातील संशोधकांना आढळला आहे. अलिकडच्या काळात प्रथमच हा पक्षी विद्यापीठ परिसरात निदर्शनास आल्याची माहिती प्राणीशास्त्र अधिविभाकडून देण्यात आली. प्राणीशास्त्र अधिविभागातील प्राध्यापक डॉ. सुनिल गायकवाड विद्यापीठ परिसरातील पृष्ठवंशीय प्राण्यांवर काम करीत आहेत. 'रुडी शेलडक' हा स्थलांतरित पक्षी त्यांना सर्वप्रथम ७ मार्च २०२० रोजी वि.स. खांडेकर भाषा भवनच्या पिछाडीस असलेल्या तलावामध्ये आढळला. या पक्षाची नोंद करून त्यांनी त्याची छायाचित्रे घेतली आहेत.

### भारतीय उपखंडात हिवाळ्यात आगमन

भारतातील अनेक स्थलांतरित पक्षांपैकी 'रुडी शेलडक" असून त्याला भारतात 'ब्राह्मणी बदक' म्हणूनही ओळखतात. या विशिष्ट पक्ष्याची लांबी २३ ते २८ इंच इतकी व वजन सव्वा किलो इतके असते. याचे डोके फिकट गुलाबी असून पिसे नारंगी-तपकिरी रंगाची तर शेपटीकडील पिसे काळी असतात. हा असा प्रवासी पक्षी आहे, जो भारतीय उपखंडात हिवाळ्यात आगमन करतो आणि एप्रिलमध्ये परत जातो. हा सुमारे २६०० कि.मी. इतका प्रवास करू शकतो आणि जवळपास ६००० मीटर इतक्या उंचीवर पोहचू शकतो. जम्मू-काश्मीरमधील अति उंचीवरील तलावात आणि दलदलीमध्ये ते प्रजनन करतात.



डॉ.गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार, भारतात सुमारे ३५० हून अधिक स्थलांतरित पक्षांच्या प्रजातींची नोंद होत असल्याची माहिती मिळते. परंतु, पाणथळ जागांच्या प्रदूषणासह विविध कारणांमुळे या पक्ष्यांच्या प्रजाती कमी होत चालल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या संवर्धनासाठी पाणथळ जागांचे संवर्धन करणे गरजेचे आहे. जगामध्ये 'रुडी शेलडक' याचा आढळ उत्तर-पश्चिम आफ्रिका, इथिओपिया, दक्षिण-पूर्व युरोप ते मध्य-आशिया ओलांडून दक्षिण-पूर्व चीनपर्यंत व दक्षिण आशियामध्ये आहे. सन २०२० च्या जागतिक स्थलांतरित पक्षी दिनाचा विषय 'बर्ड्स कनेक्ट अवर वर्ल्ड" असा आहे. यामध्ये जगभरातील स्थलांतरित पक्ष्यांचे मार्ग शोधण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या ट्रॅकिंग तंत्रज्ञानाचा संबंधित पक्ष्यांच्या संवर्धनासाठी अधिक प्रभावीपणे कसा उपयोग करता येईल, यावर जगभरातील पक्षीतज्ज्ञांनी लक्ष केंद्रित केले आहे.

तरुण भारत
Sun, 10 May 2020
https://epaper.tarunbharat.com/c/51764426

# रामायणावरील आंतरराष्ट्रीय वेबिनारमध्ये आज डॉ. अर्जुन चव्हाण यांचे मार्गदर्शन

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी



अधिविभागातील प्रा. डॉ. अर्जुन चव्हाण रविवारी (दि.१०) 'वैश्विक फलकपर रामायण विश्वकोश' या विषयावरील आंतरराष्ट्रीय वेबिनारमध्ये मार्गदर्शन करणार आहेत. उत्तर प्रदेश मंडल ऑफ अमेरिका, कॅलिफोर्निया, एस.एस.आर.आय., मुंबई, अयोध्या शोध संस्थान, अयोध्या व रूसी भारतीय मैत्री संघ दिशा, मॉस्को यांच्या संयुक्त विद्यमाने चर्चासत्र होत आहे. हिंदी समीक्षक म्हणून परिचित असलेले डॉ. चव्हाण 'महाराष्ट्र में रामायण विश्वकोश के लिए उपलब्ध आद्यतन सामग्री की प्रासंगिकता' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. केंद्र शासनाच्या सहाय्याने 'वैश्विक फलकपर रामायण विश्वकोश' या विश्वकोशाचे १५० खंड काढण्याचा संकल्प केला आहे. त्यानुसार जगभरातील महत्त्वपूर्ण माहिती गोळा करण्याचे काम सुरू होत आहे. डॉ. चव्हाण या प्रकल्पात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.